## *राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक*

*(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)*

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपील**

**क्र.रामाआ/नाशिक/द्वितीय अपील क्रमांक – १३८८/२०२२/जळगांव**

| | | |
|---|---|---|
| १ श्री. किरण भिमराव जाधव<br>रा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक,<br>चाळीसगांव, ता. चाळीसगांव,<br>जि. जळगांव-४२४१०१. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा,<br>स्वच्छता निरीक्षक,<br>आरोग्य विभाग, नगरपरिषद, चाळीसगांव,<br>ता. चाळीसगांव, जि. जळगांव. | : | प्रतिवादी |
| २ प्रथम अपिलीय अधिकारी तथा,<br>मुख्याधिकारी,<br>नगरपरिषद चाळीसगांव,<br>ता. चाळीसगांव, जि. जळगांव. | : | प्रतिवादी |

**सुनावणी दिनांक – १२/०१/२०२३**

अपिलार्थी यांनी दि. ०९/०३/२०२२ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिल दाखल केले असून त्यामध्ये त्यांनी मागणी केलेल्या संपुर्ण माहितीचा तपशिल समाधानकारक नसल्याने समाधान होत नाही, असे कारण नमूद केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी दि.१२/०१/२०२३ रोजी आयोजित करण्यात आली होती.

**सुनावणीसाठी उपस्थित-** अपिलार्थी वगळता सर्व पक्षकार उपस्थित होते.

अपिलार्थी यांनी दि. ०४/०६/२०२१ रोजीच्या माहिती अर्जान्वये सन २०२०/सन २०२१ या कालावधीतील १. हल्लीत सुरु असलेला घनकचरा ठेका हा कोणत्या संस्थेस देण्यात आलेला आहे. त्या संस्थेचे संपुर्ण नांव, २. घनकचरा ठेका हा कोण-कोणत्या अटी शर्तीवर देण्यात आलेला आहे. त्या अटी शर्तीच्या करारनाम्याची नक्कल मिळावी, ३. घनकचरा ठेक्यात एकूण किती कर्मचारी कार्यरत आहेत. त्या कर्मचाऱ्यांची संपुर्ण स्पष्ट नांवे कळवावे, ४. ठेक्यामध्ये काम करत असलेल्या कर्मचाऱ्यांना किमान वेतनाने वेतन अदा केल्याचे लेखी व्हाऊचर, बिल मिळावे, ५. ठेक्यात काम करत असलेल्या कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाहनिधी (फंड) कपात केल्याचे लेखी विवरण मिळणे बाबत, ६. ठेक्यात काम करत असलेल्या कर्मचाऱ्यांना सुरक्षा साधने कोण कोणते पुरवले जातात त्यांचे बिल याबाबतची माहिती मिळण्याची विनंती केली होती. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीना दिनांक ०२/०७/२०२१ रोजीच्या पत्रान्वये मुद्दा क्र. १ बाबत मे. आर एम भालेराव चाळीसगांव यांना घनकचरा संकलन करुन वाहतूक करण्याचा

ठेका देण्यात आलेला आहे, मुद्दा क्र. २ बाबत सोबत जोडलेला आहे, मुद्दा क्र. ३ ते ६ बाबत माहिती उपलब्ध नाही, असे कळविले.

तद्नंतर अपिलार्थी यांनी दि. १३/०७/२०२१ च्या अर्जान्वये प्रथम अपिल दाखल केले. सदर प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी सुनावणी घेऊन दि.०६/१०/२०२१ रोजी, निर्णय पारित करुन अपील अंशता मान्य करण्यात येत असुन जन माहिती अधिकारी यांनी संबंधीत माहिती लेखा विभाग तसेच संबंधीत ठेकेदार यांचेकडून घेऊन अपिलार्थी यांना तात्काळ उपलब्ध करुन द्यावी असे निर्देश देवुन प्रथम अपिल निकाली काढले. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १३/१२/२०२१ रोजीच्या पत्रान्वये मुद्दा क्र. १ बाबत मे. आर. एम. भालेराव चाळीसगांव यांना घनकचरा संकलन करुन वाहतूक करण्याचा ठेका देण्यात आला आहे, मुद्दा क्र. २, ३, ५,६ बाबत माहिती जोडून पुरविली व मुद्दा क्र. ४ बाबत कर्मचाऱ्यांचे पगार बँक स्टेटमेंट सोबत जोडली आहे, असे कळविले.

सुनावणीदरम्यान तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपिलार्थी यांनी मुद्दा क्र. १ ते ६ द्वारे माहिती मागितले असुन अपिलार्थीस दिनांक ०२/०७/२०२१ रोजीच्या पत्रान्वये मुद्दा क्र. १ व २ बाबत माहिती पुरविली असुन मुद्दा क्र. ३ ते ६ बाबत माहिती उपलब्ध नाही असे कळविले होते. तसेच प्रथम अपिल आदेशानंतर दिनांक १३/१२/२०२१ रोजीच्या पत्रान्वये मुद्दा क्र. १ ते ६ बाबत माहिती पुरविली आहे.

सुनावणीदरम्यानचा युक्तिवाद व आयोगास सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता असे दिसून आले की, अपिलार्थी यांच्या दिनांक ०४/०६/२०२१ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस विहित मुदतीत मुद्दा क्र. १ बाबत माहिती पुरविली व मुद्दा क्र. २ ते ६ बाबत माहिती उपलब्ध नाही असे कळविले असल्याचे दिसुन येते. तसेच प्रथम अपिलाच्या निर्णयानंतरही मुद्दा क्र.१ ते ६ बाबत माहिती पुरविली असल्याचे दिसुन येते. यावरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविण्यास हेतुपुरस्सर टाळाटाळ केल्याचे दिसून येत नाही, ही बाब विचारात घेता अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाच्या कलम ७(१) अन्वये केलेली कार्यवाही योग्य असून प्रस्तुत अपिलात काहीही तथ्य नाही.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

प्रस्तुत द्वितीय अपील क्रमांक १३८८/२०२२/जळगांव निकाली काढण्यात येत आहे.

**(समीर सहाय)**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

**क्रमांक : रामाआ- नाशिक/द्वि.अ.क्र./१३८८/२०२२/जळगांव ओ-** 829 **दिनांक-** 03/07/2023